# जीवनाचा मार्ग कसा निवडू ?

**डॉ. अभय बंग**

दहावी आणि बारावीचे निकाल लागले की 'आता मी पुढे काय करु?', किंवा आजच्या परिभाषेत, 'कोणते करीअर निवडू?' हा प्रश्न लाखो किशोर व तरुण मुलामुलींपुढे अुभा राहतो. शिक्षण पूर्ण झाल्यानंतरही हा प्रश्न अुभा आहेच. या अेका निर्णयावर पुढील संपूर्ण आयुष्याचे यश-अपयश, सांपत्तिक व सामाजिक स्थिती अवलंबून असल्याने हा प्रश्न साधा न राहता जणु आयुष्याचा ब्रह्मप्रश्न होअून बसतो.

हा निर्णय घेण्यासाठी बहुतेक जण चांगल्या नोकरीची संधी, अितर सर्वजण काय करताहेत ते, करीअर गाइडन्स, अॅप्टीट्यूड टेस्ट अशा पध्दती वापरतात. विद्यार्थी व पालकांच्या मनात काही ठराविक स्वप्ने असतात. त्या स्वप्नांपर्यंत पोचवणारे करीअर ते शोधत असतात. हा शोध सहसा अमेरिकेत ज्या व्यवसायाला मागणी आहे तो, किंवा मेडिकल, अिंजिनीअरिंग, मॅनेजमेंट अशा करीअरचा असतो. तशा करीअर पर्यंत पोचवू शकणारे शिक्षण त्यांना हवे असते. वैश्विक जॉबमार्केटमधे विक्रीसाठी ठेवायला या बारावी पास कच्च्या मानवीय मालापासून पक्का माल मोठ्या प्रमाणावर अुत्पादन करणे हा आता कॉलेज शिक्षणाचा अुद्देश्य झाला आहे. स्वत:ची जास्तीत जास्त किंमत मिळवून देणारे करीअर प्रत्येकाला हवे आहे.

करीअर निवडतांना आपल्या कळत-नकळत आपण कसला सौदा करतो आहोत ?

लहानपणी अेक गोष्ट वाचली होती. अेक आंधळा राजा आपल्या महालात बसलेला होता. अचानक रस्त्यावरुन त्याला आवाज अैकू आला, "ईश्वर अन्यायी आहे. ईश्वर अन्यायी आहे."

राजाने आपल्या सैनिकांना पाठवून कोण ही तक्रार करतो आहे हे बघायला सांगितले. थोड्याच वेळात सैनिक अेका गरीब तरुणाला बांधून घेअून आले. म्हणाले, "महाराज, हाच माणूस ईश्वराला शिव्या देतो आहे."

राजाने तक्रारीचे कारण विचारले. तो गरीब तरुण म्हणाला, "राजा, आपणा दोघांना ईश्वराने मानवी जन्म दिला. पण ईश्वराने तुला राजमहाल व मला केवळ लक्तरे द्यावीत. हा धडधडीत अन्याय नाही तर काय आहे?"

राजा भिकाÚयाला म्हणाला, "तुझ्याकडे असलेल्या मूल्यवान वस्तू विकून तू संपत्ती कमव."

भिकारी म्हणाला, "मी काय विकू ?"

राजा म्हणाला, "तुझे दोन्ही डोळे मला दे, त्या बदल्यात अेक लक्ष सुवर्णमुद्रा घे."

भिकाÚयाने सौदा स्वीकारावा की नाकारावा?

भिकाÚयाने सौदा स्वीकारला की नाही हे कुतुहूल आपण त्या गोष्टीसोबत सोडून देऊ. पण तसलाच यक्षप्रश्न आजच्या तरुण पिढीसमोर आहे. जागतिक अर्थव्यवस्था सध्या राज्य करते आहे. ती पैशाच्या बदल्यात जीवनदृष्टीचा सौदा मागते, पूर्ण आयुष्यभर झापडं लावून तिची गुलामगिरी मागते. राजा हरिश्चंद्राला विक्रीसाठी अुभा केल्यावर चांडाळ जोरजोरात हरिश्चंद्राचे वर्णन करुन लोकांना बोली बोलण्यास आवाहन करतो. तशी आज प्रत्येकाची किंमत ठरवली जात आहे व बोली बोलली जात आहे. आपली योग्य ती किंमत वसूल करण्यासाठी पध्दती देखील विकसीत झाल्या आहेत.

## प्रचलीत 'स्वॉट' पध्दत

आजची मॅनेजमेंटची विचारसरणी करीअर निवडण्यास मदत करणारी अेक पध्दत आपल्याला देते. तिला SWOT विश्लेषण म्हणतात. माझ्या व्यक्तित्वातील व बाह्य समाजातील घटकांचा S,W,O आणि T या अंतर्गत विचार करायचा.

माझ्या

S = Strengths = बलस्थान, विशेषता

W = Weakness = दुर्बलता, कमतरता,

कोणत्या आहेत ? त्या काळजीपूर्वक शोधायच्या. यादी बनवायची.

त्यानंतर, बाहेरच्या जगात असलेल्या

O = Opportunities = संधी

T = Threats = धोके,

कोणते ? त्यांचीही नीट यादी बनवायची.

माझ्या कमतरता व बाह्य धोके टाळून, माझ्या बलस्थानांची, विशेषतांची चांगलीत चांगली किंमत देणारी संधी कुठे आहे? ते आपले करीअर निवडावे असे ही पध्दत सांगणार. मूळात स्पर्धेच्या बाजारात स्वत:साठी चांगल्यात चांगली अशी निवड करण्यासाठी ही मॅनेजमेंटची पध्दत निर्माण झाल्याने अिथे 'संधी'चा अर्थ सहसा 'विक्रीसाठी संधी' असा असतो. मी स्वत:कडे बाजारातील विक्रीची वस्तू म्हणून बघावे काय? माझी बोली बोलली जावी का?

म्हणजे वरपांगी निव्वळ व्यावहारिक वाटत असलेला हा करीअर निवडीचा प्रश्न जीवनाचा अेक मूलभूत नैतिक प्रश्न आहे. माझे आयुष्य विक्रीसाठी बाजारात ठेवले आहे का? ठेवावे का?

वस्तुत: निव्वळ व्यावहारिक दृष्टया विचार केला तरी अुत्तर सोपे आहे. कोणत्याही सौद्यात विपुल प्रमाणात अुपलब्ध गोष्टीची किंमत कमी व कमी प्रमाणात अुपलब्ध गोष्टीची

किंमत जास्त असते. आज अर्थव्यवस्थेत रुपये किंवा डॉलर्स महापद्मांच्या संख्येने अुपलब्ध आहेत. माझं आयुष्य मात्र माझ्याकडे केवळ अेकच आहे. या जीवनाच्या मार्गावरुन मी अेकदाच जाणार आहे. अिथे वन्समोअर नाही. माझे आयुष्य अक्षरश: अेकमेवाद्वितीय आहे, व म्हणून माझ्यासाठी ते अमूल्य आहे.

या अमूल्य आयुष्याच्या बदल्यात कागदाच्या चिटो-यांचा सौदा करणा-याला काय म्हणावे ?

प्रश्न केवळ करीअर निवडण्याचा नाही. अर्थपूर्ण जीवन शोधण्याचा आहे. म्हणून मूळ प्रश्न आपण वेगळ्या भाषेत मांडू - *मी हे आयुष्य अर्थपूर्णरीत्या कसे जगावे? ती निवड करण्याची पध्दत काय?*

## विनोबा पध्दत

या मॅनेजमेंट पध्दतीवर 'भारतीय सांस्कृतिक मॅनेजमेंट'चे कलम चढवून आपण अेक नवीन पध्दत विकसीत करु शकतो. या पध्दतीतील मूळ विचार हा विनोबांनी सांगितलेला मी लहानपणी त्यांच्या तोंडून अैकला आहे. त्यावर मी फक्त आजच्या परिस्थितीनुरुप कलम चढवतो आहे. म्हणून ह्या पध्दतीला आपण 'विनोबा पध्दत' म्हणूया.

आपल्या जीवनाचा मार्ग निवडण्यासाठी विनोबांनी भारतीय संस्कृतीतले काही शब्द वापरले.

1. **स्वभाव**. (स्व+भाव) : माझ्या नैसर्गिक वृत्ती, क्षमता, माझा पिंड.

   आपण रोजच्या भाषेत "त्याचा स्वभाव तापट आहे" असं म्हणतांना जो स्वभाव म्हणतो तेवढा मर्यादित अर्थ अिथे नाही. माझे शरीर, बुध्दी व मन सर्व मिळून बनतो माझा 'स्व-भाव'. मी जसा आहे तो माझा स्व-भाव. माझा स्वभाव हा बहुतांश मला निसर्गदत्त असतो. काही प्रमाणात माझे प्रयत्न व शिक्षण याद्वारे मी त्यात बदल किंवा विकास करतो. त्या सर्वांचं अेकूण फलित म्हणजे आजचा माझा स्वभाव.

   SWOT मधील S व W, माझी बलस्थाने व कमतरता, ही माझी आंतरिक असतात. म्हणून ती माझ्या 'स्वभाव' मधे येतात.

2. **स्वधर्म** (स्व+धर्म) : माझे समाजाप्रती असलेले कर्तव्य.

   रूढ धर्मांशी (हिंदु, मुसलमान, खिश्चन अि.) या 'स्वधर्म'चा काही संबंध नाही. हा कोणता स्वधर्म?

   निव्वळ अुपासनापध्दती हा धर्माचा अर्थ अभिप्रेत नाही. 'धर्म म्हणजे जो समाजाला धारण करतो' अशी महाभारतात धर्माची व्याख्या आहे. समाज टिकून राहायचा असेल तर जो आवश्यक आहे तो धर्म. *धर्म हा सामाजिक कर्तव्यरुप असतो.* ज्या समाजात मी जन्माला आलो, वाढलो व जगतो त्या बाह्य समाजाचे मी

प्रचंड ऋण लागतो. त्या समाजात माझे जे कर्तव्य तो माझा स्वधर्म. तो माझा स्वत:चा, खरा व्यक्तिगत धर्म. ही कर्तव्यपूर्ती हाच माझ्या जीवनाचा सामाजिक अर्थ, म्हणजेच स्वधर्म.

हा स्वधर्म प्रत्येकाचा निरनिराळा, विशेष राहील. भारतात जन्मलो, अिथल्या समाजात माझे कर्तव्य पूर्ण करणे हा माझा स्वधर्म. दिवा घेअून तो अमेरिकेत शोधायला जावे लागणार नाही. पण अमेरिकेत जन्मलेल्या भारतीय वंशाच्या तरुणांना भारतभूमीचे कितीही भावनात्मक आकर्षण वाटले तरी ती निव्वळ आसक्तीच म्हणावी लागेल. ज्या समाजात ते जन्मले, वाढले त्या समाजातील कर्तव्य पूर्ण करणे हा त्यांचा स्वधर्म.

स्वधर्माची महत्ता सांगणारी अेक हृदयंगम कथा ख्रिश्चन धर्मात आहे. अेक धर्मसाधक मठातील तळघरात वर्षानुवर्षे ईश्वराची साधना करत होता. फक्त रोज अेक तास मठाबाहेरच्या भुकेल्या लोकांना अन्न वाढण्याची त्याची जबाबदारी होती. बाकी पूर्णवेळ तो संपूर्ण अेकाग्रतेने ईश्वराच्या साक्षात्कारासाठी ध्यानसाधना करण्यात मग्न होता. अनेक वर्षाच्या साधनेनंतर अेका रात्री त्याला स्वप्नात संदेश मिळाला - "अुद्या सकाळी सात वाजता तुला प्रत्यक्ष ईश्वर दर्शन देईल."

साधक अतिशय आनंदित झाला. आयुष्यभराची साधना आज सफल होणार. सकाळी अुठून ध्यानाला बसला. सात वाजायला आले. दाराबाहेर त्याला दिव्य प्रकाश दिसू लागला. आणि त्याच क्षणी त्याच्या अन्न वाटपाच्या पाळीची घंटी वाजली. बिचारा साधक! 'आता काय करु?' या द्विधेत पडला. पण शेवटी अन्न वाटायला जाणे हेच आपले कर्तव्य आहे हे मानून तो निरुपायाने बाहेर गेला. परत आला तोवर ईश्वर अदृष्य झाला होता.

त्या रात्री अत्यंत दु:खी, व्याकूळ हृदयाने साधकाने ईश्वराला क्षमा मागितली. "तू माझ्या दारी आलास, पण मी तुझ्याकडे पाठ फिरवून बाहेर गेलो. आयुष्यभरात अेकदाच येणारी संधी घालवली."

आणि त्याला आवाज अैकू आला - "तू माझ्या दर्शनासाठी थांबला असतास तर मी अदृष्य झालो असतो. भुकेल्यांना अन्न देण्यास तू गेलास, आता मी कायम तुझ्या हृदयात राहीन."

समाजातील अितरांच्याप्रती माझे प्राप्त कर्तव्य पूर्ण करणे हा माझा सर्वोच्च धर्म आहे, स्वधर्म आहे.

स्वधर्म अबाध्य आहे. सर्वोपरी आहे. तो माझ्यासाठी बनवला जात नाही, तर माझा जन्म त्याच्या पूर्ततेसाठी होतो. म्हणजे तो माझ्या जन्माचे कारण, अुद्देश्य आहे. माणसाला देह आहे व समाजात स्थान आहे. या दोन्हीमुळे या देहा-मनाने समाजातील

कर्तव्य पूर्ण करणे हा स्वाभाविकच त्याचा धर्म आहे. म्हणून माणसाला स्वधर्माशिवाय दुसरी गती नाही.

माझा स्वधर्म माझ्या अवतीभवतीच्या समाजातील गरजांनी ठरवला जातो. *बाजारातील संधींनी नव्हे, माणसांच्या गरजांनी.* त्यानुसार प्रत्येकाने आपला स्वधर्म निवडावा. स्वार्थ-संधीच्या रुपात नव्हे, कर्तव्य संधीच्या रुपात तो तुमची वाट बघत कधीचाच अुभा आहे. डोळे अुघडून पाहिले की दिसेल.

स्वधर्म हा बाह्य समाजातील गरजांनी, आव्हानांनी ठरतो. म्हणून SWOT पध्दतीतील O आणि T, संधी आणि धोके यांचा विचार स्वधर्म मधे अंतर्भूत होतो. अिथे 'संधी' ही बाजारातली स्वार्थसिध्दीची संधी न अुरता अितरांच्या गरजांतून मला कर्तव्य पूर्ण करण्याची संधी बनते.

आता ही पध्दत अशी दिसते (आकृती-1)

| स्वभाव (आंतरिक) | स्वधर्म (बाह्य) |
|---|---|
| Strengths | Opportunities |
| Weaknesses | Threats |

(आकृती-1)

अेक शंका. माझा स्वधर्म केवळ माझ्या अवतीभवतीच्या स्थानिक गरजांनीच ठरावा का? विशेषत: आजच्या वैश्विक परिस्थितीत हे कसे योग्य ठरेल?

पुढे येणारा काळ दूरदृष्टीने बघून की काय, विनोबांनी तिसरी कसोटीही सांगितली -

### 3. युगधर्म :

प्रत्येक काळाचा अेक युगधर्म असतो. तो त्या काळाच्या वैश्विक प्रवाहाला अनुरुप असतो. माझ्याहून फार विराट शक्तींचे प्रवाह हा युगधर्म ठरवतात. अुदाहरणार्थ, विसाव्या शतकात स्वातं=य आणि समता हे वैश्विक प्रवाह होते. स्वातं=य, व समता यावर आधारित लोकशाही, मानवीय अधिकार आणि वंश, जाती, धर्म, लिंग यांचा अडसर न होता सर्वांना समान वागणूक या विसाव्या शतकातील वैश्विक मान्यता होत्या. म्हणून या प्रवाहांना अनुकूल असाच माझा स्वधर्म असायला

हवा. स्वातं=य व समतेच्या विरोधात जाणारा स्वभाव किंवा स्वधर्म निष्प्रभ सिध्द होईल. तो मी स्वीकारायला नको. त्याचप्रमाणे अेकविसाव्या शतकात ज्ञानाची शक्ती आणि (धार्मिक द्वेष व त्यातून निर्मित हिंसेचा व युध्दाचा धोका बघता) अहिंसा व विश्वप्रेम हे वैश्विक युगधर्म आहेत. पर्यावरणाचे रक्षण हा देखील युगधर्म आहे. माझा स्वभाव व स्वधर्म हा युगधर्माच्या अनुकूलच राखायला हवा. त्याच्या सीमेतच आखायला हवा.

## तीन कसोट्यांचा मेळ

स्वभाव, स्वधर्म व युगधर्म ह्या तीन कसोट्या विनोबांनी सांगितल्या. प्रश्न अुरतो - *त्या तिन्हींचा मेळ साधून माझे 'करीअर' कसे निवडू?*

व्हेन डायग्राम नावाच्या अेका पध्दतीची आपण मदत घेअू. अेक वर्तूळ - स्वभावाचे. त्यावर अर्धवटपणे आच्छादित करणारे, दुसरे वर्तूळ स्वधर्माचे. व या दोन्हींवर अंशत: आच्छादित करणारे तिसरे वर्तूळ युगधर्माचे. तिन्ही काही प्रमाणात वेगळे वेगळे आहेत. पण त्यांचा काही अंश हा समान आहे, सामान्य आहे. तो भाग अेकमेकांवर आच्छादलेला दिसतो.

तिन्ही वर्तुळे जिथे मिळून आच्छादित करतात ते माझे जीवितकार्य. माझे लाइफ मिशन. (आकृती-2) माझा स्वभाव, स्वधर्म व युगधर्म या तिघांनाही ते अनुकूल आहे. तिघांचीही त्यात पूर्ती होते.



(आकृती-2)

समजण्यासाठी अेक अुदाहरण घेअू. समजा विवेक हा मराठवाड्याच्या दुष्काळी ग्रामीण भागातला अेक हुषार मुलगा आहे. घरची दहा अेकर कोरडवाहू शेती आहे पण तिच्यात विशेष अुत्पन्न निघत नाही. त्याचं गाव गरीब व अंधश्रध्दाळू आहे. आई-वडिलांची अपेक्षा आहे की त्याने घरची शेती बघावी, पण त्याला त्यात आवडही नाही व पुढे स्वत:साठी अुज्जवल भविष्यही दिसत नाही. त्याचे मित्र, किंवा ज्या शहरात तो शिकला तिथला सुशिक्षित समाज तर त्याने अमेरिकेत किंवा

भारतातील बहुराष्ट्रीय कंपनीत नोकरी मिळू शकेल असा व्यवसाय बघावा या मताचे आहेत. पण विवेकला घरची ओढ व आपल्या मागासलेल्या, तहानलेल्या ग्रामीण भागासाठी काही करावे असेही वाटते. विवेकला क्रिकेट खेळायला आवडते. त्याचा नैसर्गिक कल विज्ञानाशी संबंधित विषयांकडे आहे. शिवाय विवेक दिसायला देखणा व रुबाबदार आहे. अेका जाहिरात कंपनीने त्याला मॉडेल बनण्याचीही ऑफर केली आहे. विवेकने पुढे काय करावे?

मॉडेल बनण्यात किंवा अमेरिकेत नोकरी करण्यात अर्थातच प्रचंड ग्लॅमर व पैसा आहे (संधी). विवेकमधे त्यासाठी आवश्यक निसर्गदत्त क्षमताही आहेत (बलस्थान). पण 'संधी' कडे केवळ बाजारात कमाईची संधी म्हणून न बघता माझ्या अवतीभवतीच्या समाजाच्या अपूर्ण गरजा पूर्ण करण्याची संधी म्हणून बघितले की मॉडेलिंग बाद ठरते. माझा समाज म्हणजे अमेरिकेतली जनता नसून ग्रामीण मराठवाड्याची जनता आहे व त्यांची गरज पूर्ण करणे हा माझा स्वधर्म आहे असे मानले की अमेरिकेतील नोकरी 'स्वधर्म' मधे बसत नाही. विवेकने काय करावे?

आई-वडिलांची अिच्छा व घरची शेती हा अेक जन्मदत्त स्वधर्म आहे. पण त्याकडे विवेकचा स्वभाव नाही. म्हणून त्याही मार्गात त्याला समाधान मिळणार नाही. त्याच्या अवतीभवतीच्या समाजात रोगराई खूप आहेत. शेती मागासलेली आहे. या विषयांवर काम करण्याची गरज (स्वधर्म) आहे. विवेकला विज्ञान आवडते. त्याची अजून फोड केली तर असे दिसते की त्याचा कल वनस्पतीशास्त्र, जीवशास्त्र किंवा माणसांशी संबंधित विज्ञानांकडे नाही. म्हणून डॉक्टर बनणे किंवा कृषीतज्ञ बनणे हे ही त्याच्या स्वभावात नाही.

विवेकचा नैसर्गिक कल गणीत, पदार्थविज्ञान अशा विषयांकडे आहे. त्याला जयंत नारळीकरांचे खूप आकर्षण वाटते. "अंतरिक्ष विज्ञान विषय घेअू का?" असा विचार त्याच्या मनात डोकावतो आहे. ते त्याच्या स्वभावात फिट बसते, पण स्वधर्माचे काय? अंतरिक्षातील तारकांअेवढीच ओढ त्याला आपल्या अवतीभवतीच्या गावांचीही वाटते. शिवाय त्यांच्याप्रती जबाबदारीही वाटते (स्वधर्म). विवेकने काय निवडावे?

विवेकने शेवटी काय निवडले हे आपल्याला माहीत नाही. कारण तो कल्पनेच्या प्रदेशातील पात्र आहे. पण स्वभाव-स्वधर्माची कसोटी लावून त्याला सुचविता येईल की त्याने पाणी पुरवठ्याशी संबंधित वैज्ञानिक विषय - सिव्हिल इंजिनीअरिंग किंवा वॉटर मॅनेजमेंट किंवा पर्यावरणशास्त्र - निवडल्यास त्याचा स्वभाव व स्वधर्म यांचा मेळ जुळू शकतो. आणि पाणी हा अर्थातच या युगाचा प्रमुख प्रश्न असल्याने तो युगधर्माशीही सुसंगत आहे. कुणास ठाअूक, विवेकमधे भविष्यातला विलासराव साळुंखेंसारखा सामाजिक भगिरथ लपलेला असेल.

## अन्य आवडी व कर्तव्ये

जीवितकार्य कसे निवडावे हे कळले. पण अेक प्रश्न मनात अुठतो - स्वभाव-स्वधर्म-युगधर्म या तिन्हींचा मेळ नाही असे अन्य काही मी करुच नये काय? तशा कार्यांचे माझ्या जीवनात स्थान काय? अशा अितर गोष्टी छंद, आपद्धर्म किंवा परधर्म यात बसतील.

विवेकच्या स्वभावात संगीत किंवा क्रिकेट अशा अन्य आवडी असतील पण अेकतर त्याला त्यांची पुरेसी निसर्गदत्त देणगी नाही (अपुरा स्वभाव) शिवाय त्याच्या अवतीभवतीच्या समाजात त्याहून महत्वाच्या, जगण्या-मरण्याशी संबंधित अशा प्राथमिक गरजा आहेत ज्या पूर्ण करणे हा त्याचा प्रथम स्वधर्म आहे. म्हणून संगीत किंवा क्रिकेट हे त्याचे जीवितकार्य होअू शकत नाहीत. (अन्य कोणी यांच्या माध्यमातून समाजासाठी अुपयोगी कार्य करु शकत असेल, त्यांचा तो स्वधर्म होअू शकेल, विवेकचा नाही.) पण तरी ते त्याच्या जीवनात छंद म्हणून असूच शकतात. *स्वधर्म-बाह्य स्वभावाला आपण छंदामध्ये रुपांतरित करु.* कारण शेवटी तोही आपलाच नैसर्गिक भाग आहे.

आणि समाजातील काही तीव्र गरजा व्यक्तीच्या स्वभावानुकूल नसतील तरी त्यांच्याकडे तो दुर्लक्ष करु शकत नाही. ती कर्तव्ये 'आपद्धर्म' म्हणून काही काळापुरती स्वीकारावी लागू शकतात. अुदाहरणार्थ अण्णा हजारेंनी भ्रष्टाचाराविरुध्द आंदोलन अुभारले किंवा गुजराथमधे भूकंपात हजारो लोक मेले. विवेकला त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे शक्य नाही कारण त्या समाजाच्या तातडीच्या गरजा आहेत; म्हणून त्याच्या स्वधर्माचा भाग आहेत. आपद्धर्म म्हणून काही काळापुरता त्याला प्रतिसाद देणे हा विवेकचा स्वधर्म आहे. पण ती त्याच्या स्वभावानुकूल नसल्यास तो त्यात आपली पूर्ण नैसर्गिक क्षमता, शक्ती प्रकट करुन शकणार नाही. त्याला पूर्णपणे फुलण्याचे, (अब्राहम मॅस्लोच्या परिभाषेत 'अ‍ॅक्चुअलायझेशन'चे) समाधान मिळणार नाही. असमाधान राहील. शेवटी आपल्या नैसर्गिक स्वभावाशी प्रतिकूल आपद्धर्म कोणीही फार काळपर्यंत धारण करु शकत नाही. जिथे स्वभाव व स्वधर्म मिळतात त्यातूनच प्रत्येकाचे मुख्य जीवितकार्य घडू शकेल. *स्वभाव-बाह्य स्वधर्म हा 'आपद्धर्म' म्हणून तात्कालिक धर्म बनू शकतो.*

या शिवाय आपल्या स्वधर्माचा भाग नसलेली अनेक कर्तव्ये जगात आहेत. अुदाहरणार्थ अफ्रिकेत दुष्काळ आहे, अमेरिकेत लोभ, भय व हिंसा आहे, इराकमधे युध्द आहे. आजच्या वैश्विक युगात आपल्याला त्यांचे भान ठेवलेच पाहिजे. आपण जिथे आहोत तिथून शक्य तितका हातभारही यासाठी होणा-या प्रयत्नांना लावला

पाहिजे. पण तो माझा स्वधर्म नाही. कारण या शरीराच्या व माझ्या साधनांच्या मर्यादांमुळे मी त्या प्रयत्नांत अेका मर्यादेपलीकडे सामील होअू शकत नाही. आपला स्वधर्म सोडून ते कार्य करण्याचा प्रयत्न केवळ माझा मोह किंवा अहंकार ठरु शकेल. माझे हृदय व्यापक असावे पण मला प्रत्यक्ष कामासाठी माझ्या साधनांद्वारे पोचू शकण्याचा मर्यादित स्वधर्मच निवडावा लागेल.

मग ती अुरलेली कर्तव्ये ही 'परधर्म' झालीत. (पुन्हा स्मरण ठेवू - ह्या परधर्माचा हिंदु-मुसलमान-खिश्चन यांच्याशी काही अेक संबंध नाही.) जो माझा स्वधर्म नाही, पण तरी या विश्वात आवश्यक कर्तव्य आहे तो 'परधर्म'. अन्य कुणीतरी तो अधिक नैसर्गिकपणे करील अशी श्रध्दा मला सहा अब्ज माणसांवर किंवा वैश्विक शक्तीवर राखली पाहिजे. परधर्म हा नेहमीच आकर्षक, मोहक वाटतो. त्यात स्वधर्मापासून पळवाट असते. दुरुन डोंगर साजरेच वाटतात. पण तो दृष्टिभ्रम किंवा मनाचा पलायनवादी खेळ असतो.

आता आपल्यासमोर चित्र बनते (आकृती-3)




(आकृती-3)

पण तिन्ही कसोट्यांमधे बसणा-या जीवितकार्याशिवाय केवळ दोन कसोट्यात बसणारी काही कामे असू शकतात. अुदाहरणार्थ, विवेकच्या ग्रामीण भागातील शेतक-यांना शेतीचे ज्ञान पुरेसे नाही. त्यांना पर्यावरणाशी समतोल राखणारी पण अधिक अुत्पन्न देणारी शेती शिकायला मदत करणे ही अवतीभवतीच्या समाजाची गरज आहे. तो विवेकचा स्वधर्म आहे, शिवाय तो पर्यावरण रक्षणाच्या युगधर्माशी अनुकूलही आहे.

पण तो विवेकचा स्वभाव नाही. शेतीत त्याला आवड नाही, समज व गती नाही. अशी कर्तव्ये 'दुय्यम कार्य' बनू शकतात - पण जीवितकार्य बनू शकत नाही.

आकृतीत दाखवलेले विविध कार्यांचे क्षेत्रफळ हे त्या त्या कार्यांच्या महत्वाच्या प्रमाणात नाही. जीवित कार्य हे स्वाभाविकत: मध्यवर्ती राहील, व सर्वात अधिक वेळ, शक्ती त्यात खर्च होईल. दुय्यम कार्य किंवा आपद्धर्म, परधर्म आणि छंद हे तात्कालिक किंवा दुय्यम प्राथमिकतेचे राहतील म्हणून त्यांच्यावर खर्च होणारा वेळ, शक्ती कमी प्रमाणात राहील. हे प्रत्येकाच्या विवेकावर अवलंबून राहील.

शिवाय सर्व वर्गीकरणे लवचिक व सापेक्ष आहेत. यात 'हेच बरोबर' अशी कट्टरता नसावी. शिवाय जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यात त्याच माणसाचा स्वभाव किंवा स्वधर्म बदलू शकतो. काल आवड नसलेल्या विषयात आज आवड निर्माण होऊ शकते. आजपासून दहा वर्षांनी समाजात माझी गरज, माझे कर्तव्य वेगळे असू शकेल. म्हणून माझा स्वधर्म बदलू शकतो. त्या अनुरुप मी बदलायला तयार असले पाहिजे. अन्यथा मी समाजप्रवाहाशी विसंगत बनेन. आपले कार्य करायला फार अधिक धडपड करावी लागत असेल किंवा हृदयात फार अस्वस्थता व ताण निर्माण होत असेल तर तो अिशारा समजून 'आपला स्वभाव, स्वधर्म किंवा युगधर्म यांच्याशी विसंगत आपण काम निवडले आहे का ?' हे तपासून बघावे. तसे आहे असे आढळले तर मार्गात योग्य तो बदल करावा. तसे नसेल तर आपली दिशा, जीवितकार्याची निवड बरोबर आहे हे पक्के मानून प्रयत्न सुरु ठेवावेत.

'माझे जीवन करीअरच्या किंवा नोकरीच्या बाजारात विकण्याची सवंग गोष्ट नाही, त्याहून फार अधिक मूल्यवान आहे' हा स्पष्ट आंतरिक निर्णय, आणि आपला स्वभाव, स्वधर्म व युगधर्म या तीन गोष्टी ओळखण्याची विवेकबुध्दी यांच्या आधारे प्रत्येकाला आपले जीवितकार्य निवडता येईल. ते कार्य चांगल्या रीतीने करण्यासाठी आवश्यक त्या शिक्षणाची निवड करता येईल. जीवितकार्य योग्य निवडले तर युगप्रवाह, समाजप्रवाह व व्यक्तीच्या निसर्गदत शक्ती सर्व आपल्याला मदत करायला लागतात. करीअरपेक्षा कितीतरी अधिक आपल्या हातून सहज घडायला लागते. शिवाय स्वभाव-स्वधर्म-युगधर्म यांच्याशी सुसंगत कार्य करत असल्याने आंतरिक द्वंद्व नाहिसे होऊन जीवनाच्या तारा तंबो-यासारख्या सुरात लागतात. जीवन ओझे न होता आनंदमय होते.

जीवनापासून आपल्याला अजून काय हवे ?